# महाराष्ट्र शासन
# शिक्षण सहसंचालक (उच्च शिक्षण)

१७ डॉ आंबेडकर रोड, पुणे विभाग,पुणे-१

Web: www.jdhepune.info

E-mail ID- admin@jdhepune.info

फोन नं.०२०-२६१२७८३३/२६०५१६३२

फॅक्स नं. ०२०-२६०५१६३२


क्र.ससं/उशि/पुवि/१.१०/पदनिश्चिती/कार्यशाळा/२०२१/786

दि.२२-०२-२०२१

प्रति,

प्राचार्य/प्राचार्या,

सर्व अशासकीय अनुदानित कला,वाणिज्य,विज्ञान, विधी, शिक्षणशास्त्र

व शारिरीक शिक्षणशास्त्र महाविद्यालय

**पुणे/अहमदनगर/नाशिक**

विषय - दिनांक १.१०.२०१८, दि.१.१०.२०१९ व दि.१.१०.२०२० च्या स्थिर विद्यार्थी संख्या (स्टॅबिलाईज संख्या) विचारात घेऊन शिक्षकीय व शिक्षकेतर पदांचा आढावा...

संदर्भ :- मा.संचालनालयाकडील क्र.पदआ-१०२१/प्र.क्र.२५/मवि-०१/२१००, दि.१८-०२-२०२१.

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये कळविण्यात येते की, अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील दि.०१ ऑक्टोबर, २०१८, दि.०१ ऑक्टोबर ,२०१९ व दि.०१ ऑक्टोबर, २०२० च्या विद्यार्थी संख्येच्या आधारावर अनुज्ञेय होणाऱ्या शिक्षक / शिक्षकेतर पदांची माहिती करणेबाबत आदेशित करण्यात आलेले आहे. त्याअनुषंगाने दि.०१.१०.२०१८, दि.०१.१०.२०१९ व दि.०१.१०.२०२० च्या विद्यार्थी संख्येवर आधारीत अनुज्ञेय होणारी शिक्षकीय / शिक्षकेतर पदांची संख्या तसेच शासनमान्य, संलग्नीकरण असलेले अनुदानित विद्याशाखा/ तुकड्या/ विषय यावर आधारीत कार्यभार निश्चित करावयाचा आहे. यासाठी खालील वेळापत्रकाप्रमाणे विशेष शिबीराचे आयोजन करण्यात येत आहे.

**शिबीर कार्यक्रम**

| अ.क्र. | जिल्ह्याचे नाव | दिनांक | ठिकाण |
|---|---|---|---|
| १ | नाशिक | २५ फेब्रुवारी, २०२१ | नौरोसजी वाडिया महाविद्यालय, पुणे-४११ ००१ |
| २ | अहमदनगर | २६ फेब्रुवारी, २०२१ | |
| ३ | पुणे | २७ फेब्रुवारी, २०२१ | |

उपरोक्त दिवशी सकाळी १०.०० ते शिबीर संपेपर्यंतच्या कालावधीत कार्यभार निश्चितीचे कामकाज सुरु राहील. विहीत केलेल्या दिवशीच संबंधीत जिल्ह्याचे कामकाज करण्यात येईल. सबब, खालील सूचनांचे पालन करुन माहितीगार कर्मचाऱ्यांसह सोबतची माहिती घेऊन, नेमून दिलेल्या दिवशीच उपस्थित रहावयाचे आहे.

१. कार्यभार वाटपाबाबतचे साप्ताहिक वेळापत्रक-प्रात्यक्षिकांसह सादर करण्यात यावे.

२. २००१-०२ नंतर नव्याने महाविद्यालय/विषय/तुकडी/विद्याशाखा अनुदानावर आली असल्यास, त्याची स्वतंत्र माहिती (शासन मान्यता व अनुदानाच्या आदेशासह) सादर करण्यात यावी.
३. १९९८-९९ ते २०१७-१८ ची या कार्यालयाने केलेल्या पदमान्यतेच्या प्रती.
४. महाविद्यालय, विद्याशाखा, विषय व तुकडी यांस शासनाकडून मान्यता मिळालेल्या आदेशांच्या सत्यप्रती.
५. महाविद्यालय, विद्याशाखा, विषय व तुकडी १०० टक्के अनुदानावर आलेल्या आदेशांच्या सत्यप्रती.
६. विद्यापीठाकडून प्रथम संलग्नीकरण देण्यात आलेल्या पत्राच्या आदेशांच्या सत्यप्रती.
७. सध्या ज्या पत्रान्वये महाविद्यालय, विद्याशाखा, विषय व तुकडी यांचे संलग्नीकरण आहे, त्या संलग्नीकरण पत्राच्या सत्यप्रती.
८. अनुदानित वरिष्ठ महाविद्यालयास अनुदानित कनिष्ठ महाविद्यालय जोडलेले असल्यास अशा संयुक्तपणे सुरु असलेल्या महाविद्यालयांनी अनुदानित कनिष्ठ महाविद्यालयास मा.शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे यांचेकडील मंजूर तुकड्या व प्रवेशित विद्यार्थी संख्या याबाबतची सन २०१८-१९, २०१९-२० व २०२०-२१ च्या पद मान्यतेची प्रत सादर करण्यात यावी.
९. या कार्यालयाकडून निश्चित केलेल्या कला व विज्ञान शाखेच्या १९९८-९९ च्या कार्यभाराची व ज्या महाविद्यालयातून वाणिज्य शाखा कार्यरत आहेत,अशा महाविद्यालयांनी **वाणिज्य विषयाचा कार्यभार हा १९८९-९० चा मा.शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य पुणे-१** यांनी मान्य केलेल्या कार्यभारानुसार आणावा. या कार्यभार निश्चितीनंतर जी महाविद्यालये, विषय, विद्याशाखा, तुकडी १०० टक्के अनुदानावर आलेली आहे, त्यांचेबाबतीत १०० टक्के अनुदान तत्वावर आलेल्या वर्षाचा कार्यभार विचारात घेऊन या कार्यालयाने निश्चित करुन दिलेल्या कार्यभाराची सत्यप्रत.
१०. शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्र.एनजीसी २२९९/(४७९५)/विशि-४, दि.२६ ऑगस्ट, १९९९ नुसार दि.१.१०.२०१८, दि.१.१०.२०१९ व दि.१.१०.२०२० ची प्रवेशित विद्यार्थी संख्या (विद्यापीठाकडे अधिकृत नाव नोंदणी असलेली) विचारात घेऊन शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या आकृतीबंधानुसार अनुज्ञेय ठरणारी / निश्चित होणारी नामाभिधानासह कर्मचाऱ्यांची संख्या.
११. सन २०१७-१८, २०१८-१९ व २०१९-२० या शैक्षणिक वर्षातील अंतीम / वार्षिक परीक्षेस प्रविष्ट झालेल्या विद्यार्थ्यांचा तपशील (विद्यापीठाच्या निकाल पत्रासह) महाविद्यालयीन स्तरावर परीक्षा असल्यास, महाविद्यालय स्तरावरील निकाल पत्राच्या विद्यार्थ्यांचा तपशील.
१२. या कार्यालयाकडून निश्चित केलेला कला व विज्ञान शाखेचा १९९८-९९ च्या कार्यभाराची व वाणिज्य शाखेच्या १९८९-९० च्या कार्यभारानुसार मंजूर शिक्षक / शिक्षकेतर पदांचा तपशील. यामध्ये मंजूर, कार्यरत, रिक्त पदांचा तपशील सादर करणे. पद रिक्त असल्यास, कोणत्या दिनांकापासून रिक्त आहे व कोणत्या कारणासाठी रिक्त आहे.

उपरोक्त माहिती सहपत्रांसह सादर करावी. तसेच सोबत प्रपत्र १ ते १८ मध्ये माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी.

सबब, सर्व माहिती अचूक राहील याची खातरजमा खुद्द प्राचार्यांनी करुन सदरची माहिती शिबीरात सहपत्रांसह सादर करावी.

**(डॉ.मोहन खताळ)**
सह संचालक (उच्च शिक्षण)
पुणे विभाग,पुणे-१.

सोबत:- वरीलप्रमाणे.